संक्षिप्त फौ. ख. क्र. ४२७/२०२३
सरकार -वि.- उत्तम
नि.क्र. ७ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - भरत भाऊराव राऊत,
वय ५१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – पोळगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. दिनांक २६.०९.२०२३ रोजी पोलिसांनी मला कोठेही बोलाविले नव्हते. मी जात असताना पोलिसांनी माझी सही घेतली. आता मला नि.क्र.९ घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. आता मला नि.क्र.१० घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६.०९.२०२३ रोजी पोलिसांनी मला मौजा पोळगाव शिवार वार्ड क्र.२, ता. भिवापूर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन ४८ देशी दारुच्या निपा व एक अक्टीव्हा मो.क्र.

एम.एच.४०-बी.डब्ल्यू.७२३० जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. मी सेवकदास गणविरला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १६.०३.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.